# ललित कला केंद्र (गुरुकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## एम्.ए. एकात्मिक (संगीत)
## प्रवेश परीक्षा नमुना प्रश्नपत्रिका

**योग्य पर्याय निवडा –**

1. संगीत या संकल्पनेत गायन, वादन व ---- या तिन्हीचा समावेश आहे. (क) चित्र (ख) शिल्प (ग) नृत्य (घ) नाट्य
2. स्वराचे चढे स्थान म्हणजे ---- स्वर होय. (क) कोमल (ख) तार (ग) तीव्र (घ) शुद्ध
3. सप्तकातील – व – ही जोडी रागात वादी-संवादी म्हणून ग्राह्य नसते. (क) रे-ध (ख) ग-नि (ग) सा-म (घ) सा-प
4. अन्य सर्व शुद्ध स्वरांसह कोमल निषाद हे ---- थाटाचे लक्षण आहे. (क) खमाज (ख) कल्याण (ग) काफी (घ) भैरवी
5. भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेल्या ------ या पार्श्वगायिका आहेत. (क) आशा भोसले (ख) श्रेया घोषाल (ग) सुमन कल्याणपूर (घ) लता मंगेशकर
6. पं. उल्हास कशाळकर यांचे ----- हे गुरु होते. (क) सवाई गंधर्व (ख) गजाननबुवा जोशी (ग) यशवंतबुवा जोशी (घ) बबनराव हळदणकर
7. साहित्य, सरगम, पाटाक्षरे व तराना अशी अंगे असलेल्या रचनेस --- म्हणतात. (क) ख्याल (ख) त्रिवट (ग) चतुरंग (घ) ध्रुपद
8. तालाच्या मध्यबिंदूस --- म्हणतात. (क) सम (ख) खंड (ग) काल (घ) ठेका
9. ----- हा ताल सात मात्रांचा आहे. (क) झपताल (ख) सप्तताल (ग) एकताल (घ) रूपक
10. तारा असलेली वाद्ये --- गटात वर्गीकृत होतात. (क) घन (ख) तंतू (ग) अवनद्ध (घ) सुषिर
11. भूप रागात ध हा स्वर ---- आहे. (क) वर्ज्य (ख) विवादी (ग) संवादी (घ) कोमल
12. दक्षिण भारतात ---- संगीत पद्धती प्रचलित आहे. (क) कर्नाटक (ख) हिंदुस्थानी (ग) सिंफनी (घ) राजस्थानी
13. पं. भीमसेन जोशी हे ---- साठी प्रसिद्ध होते. (क) ध्रुपद (ख) पॉप (ग) ख्याल (घ) फ्युजन
14. तानसेन हा ---- गायक होता. (क) ध्रुपद (ख) ठुमरी (ग) ख्याल (घ) टप्पा
15. गांधर्व महाविद्यालयाची स्थापना ---- यांनी केली. (क) पं. पलुसकर (ख) पं. भातखंडे (ग) पं. भीमसेन जोशी (घ) पं. भास्करबुवा बखले
16. महाराष्ट्रात ग्वाल्हेर घराण्याच्या ख्याल गायकीचा प्रसार --- यांनी केला. (क) अब्दुल करीम खां (ख) कुमार गंधर्व (ग) प्रभा अत्रे (घ) बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर
17. बिस्मिल्ला खां हे श्रेष्ठ ---- वादक होते. (क) बासरी (ख) शहनाई (ग) सरोद (घ) सारंगी
18. सध्या गाजत असलेल्या बाहुबली या चित्रपटाचे ---- हे संगीतकार आहेत. (क) ए. आर. रहमान (ख) शंकर-एहसान-लॉय (ग) एम.एम. किरवाणी (घ) इलायाराजा
19. ‘गीत रामायण’ स्वरबद्ध करून त्यांच्या गायनाने लोकप्रिय झालेले ---- हे ‘बाबूजी’ म्हणूनही संबोधले जात. (क) श्रीधर फडके (ख) राम कदम (ग) सुधीर फडके (घ) वसंत प्रभू
20. ‘देवाघरचे ज्ञात कुणाला’ हे प्रसिद्ध नाट्यगीत ---- यांनी स्वरबद्ध केले आहे. (क) राम मराठे (ख) जितेंद्र अभिषेकी (ग) छोटा गंधर्व (घ) रामदास कामत